# ६- संदर्भ सेवा

## संदर्भ सेवा म्हणजे काय?

१) आरोग्य उपकेंद्रे व प्रा.आ.केंद्रे या संस्थांत प्राथमिक उपचारात्मक सेवा उपलब्ध असतात.

२) परंतु अडलेले बाळंतपण, बाळंतपणातील रक्तस्त्राव, गंभीर आजार असलेले बालक, जन्माचे वेळी कमी वजन असलेले बालक, अपघाताचे रुग्ण इत्यादी. अशा वेळेला रोगांच्या गांभिर्यानुसार त्यांना ग्रामीण रुग्णालय, उपविभागिय रुग्णालय, जिल्हा रुग्णालय या विशेषज्ञ रुग्णालयात पाठविणे आवश्यक असते. अशा रुग्णांना योग्य रुग्णालयात वेळेवर पाठविणे यास संदर्भसेवा असे म्हणता येईल.

## संदर्भ सेवेचे घटक

१) उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रात योग्य तपासणी होऊन गुंतागुत ओळखणे व रुग्णास योग्य रुग्णालयाकडे पाठविणे.
यासाठी या केंद्रात प्रशिक्षित कर्मचारीवर्ग असेणे आवश्यक आहे संदर्भसेवेपुर्वी प्राथमिक उपचार होणे आवश्यक आहे.

२) वाहन व्यवस्था व प्रत्यक्ष रुग्ण स्थलांतरीत होत असतांना उपचार करण्यासाठी योग्य साधनसामुग्री व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग.

३) संदर्भसेवेव्दारे जेथे रुग्णास पाठवावयाचे आहे अशा जवळच्या सर्व रुग्णालयांची अद्ययावत यादी व तेथे उपलेब्ध असलेल्या सुविधांची यादी.